# महाराष्ट्र शासन
## जिल्हाधिकारी कार्यालय, उस्मानाबाद

क्रमांक २०२०/कोरोना नियंत्रण/कक्ष-१/सीआर

**दिनांक -०६ एप्रिल, २०२०**

## जाहीर आवाहन

कोविड -१९ च्या अनुषंगाने कोरोना या विषाणूचा प्रसार व संसर्ग प्रतिबंधित करण्यासाठी निजामोद्दीन मर्कज दिल्ली, जिल्हा पानिपत हरियाना, राजस्थान, उत्तर प्रदेश व देशाच्या इतर भागात झालेल्या जमात या कार्यक्रमात सहभागी झालेल्या उस्मानाबाद जिल्ह्यातील नागरिकांना याव्दारे जाहीर आवाहन करण्यात येते की, आपण आपली माहिती स्वेच्छेने खाली दिलेल्या हेल्पलाईनवर संपर्क साधून कळवावी.

प्रशासनातर्फे आपणास योग्य ते सर्व सहकार्य करण्यात येईल. कोरोना विषाणूस प्रतिबंध हाच कोविड-१९ यावर उपाय असल्याने आपण आपले कुटुंब, आपले प्रियजन, आपला समाज, आपला गाव हे कोरोना विषाणूच्या संसर्गापासून वाचविण्यासाठी पुढाकार घेवून सहकार्य करावे, असे याव्दारे आवाहन करण्यात येते. तसेच आपण जमात या कार्यक्रमास सामील झाल्याची माहिती प्रशासनापासून जाणीवपुर्वक लपवून ठेवल्यास व त्यातून पुढे भविष्यात आपण कोरोना बाधित आढळून आल्यास जाणीवपुर्वक कोरोना विषाणूचा प्रसार व संसर्ग केल्याबद्दल आपणाविरुध्द भारतीय दंड विधान-१८६० च्या कलम २६९, २७०, १८८ व ३४ अन्वये कडक कायदेशीर कार्यवाही करण्यात येईल याची गांभीर्याने नोंद घ्यावी.

तसेच उस्मानाबाद जिल्ह्यातील सर्व नागरिकांना याव्दारे सुचित करण्यात येते की, त्यांच्याकडे वरील विषयी कांही माहिती असेल तर खाली दिलेल्या हेल्पलाईनवर संपर्क साधून प्रशासनास माहिती देवून सहकार्य करावे.

- **संपर्कासाठीचा हेल्पलाईन क्रमांक :-**

१) श्री. संदीप पालवे, अतिरिक्त पोलीस अधिक्षक,उस्मानाबाद
**भ्रमणध्वनी क्रमांक :- ९५४५५३१२३४**

२) श्री.एम.एस.कांबळे उपजिल्हाधिकारी (रोहयो) तथा नोडल अधिकारी (कोवीड-१९)जि.का. उस्मानाबाद
**भ्रमणध्वनी क्रमांक :- ९९६०४२५८७०**

३) रोहयो विभाग, जिल्हाधिकारी कार्यालय,उस्मानाबाद
**फोन क्र. (०२४७२) २२२२७९.**

( दिप्रा मुधोळ-मुंडे )
**जिल्हाधकारी तथा अध्यक्ष,**
**जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण**
**जिल्हाधिकारी कार्यालय उस्मानाबाद**